**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

**सौ. मिनाताई ठाकरे परिचर्या प्रशिक्षण संस्था,ठाणे.**

**इंडीयन नर्सिंग कौन्सिल व महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल मान्यता प्राप्त संस्था**

**<u>प्रवेश सुचना २०१६ - २०१७</u>**

०१ ऑक्टोबर २०१६ पासून सुरू होणा-या ३ वर्षे कालानधीच्या जनरल नर्सिंग व मिडवायफी प्रशिक्षणाकरिता फक्त स्त्री उमेदवारांकडून पुढील अटी व शर्तीनुसार विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

१. **शैक्षणिक अर्हता** ः महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची १२वी ( १०+२) परिक्षा कमीतकमी ४० % गुण मिळवून उत्तीर्ण झालेली असावी. विज्ञान शाखेच्या ( पी.सी.बी. गुप विषयासह) उमेदवारांना प्राधान्य असेल परंतु विज्ञान शाखेचे पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास वाणिज्य व कला शाखेच्या उमेदवारांना गुणवत्तेनुसार प्राधान्य दिले जाईल. १२ वी ( १०+२) परिक्षेत सर्व विषयात मिळालेल्या एकूण गुणांच्या गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांची निवड केली जाईल.

२. **वयोमर्यादा** ः उमेदवाराचे वय दिनांक ३१.१२.२०१६ रोजी १७ वर्षे पूर्ण व जास्तीत जास्त ३५ वर्षा पर्यंत असावे.

३. **प्रवेशासाठी एकुण जागा** ः तीस (३०) मागासवर्गीय उमेदवारांसाठी महाराष्ट्रराज्य शासन नियमानुसार जागा राखीव.

४. **पात्रता** ः एकूण प्रवेश क्षमतेच्या ५०% जागा ठाणे महानगरपालिका क्षेत्र व ५० % जागा ठाणे व पालघर जिल्हा क्षेत्रा मध्ये कमीत कमी १५ वर्ष रहिवास असलेल्या उमेदवारांसाठी उपलब्ध असतील. ठाणे महानगरपालिका हद्दीतून राखीव जागांवर योग्य प्रमाणात राखीव प्रवर्गातून उमेद्वार उपलब्ध न झाल्यास ठाणे व पालघर जिल्ह्यातील पात्र उमेदवारांचा त्या जागांसाठी विचार केला जाईल. उमेदवार १० वी व १२ वी परिक्षा ठाणे महानगरपालिका व ठाणे व पालघर जिल्हा हद्दीतील शासन मान्य संस्थेतून उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

५. **प्रवेश अर्ज शुल्क** ः खुल्या वर्गा साठी रू १००/- व राखीव उमेदवारांसाठी रू ५०/- आहे.

विहीत नमुन्यातील अर्ज मिळविण्यासाठी प्राचार्या यांच्या नांवे लेखी अर्ज करून सोबत शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र अथवा शाळे कडुन प्राप्त झालेले बोनाफाईड सर्टीफिकेट , १२ वी ची गुणपत्रिकेची प्रत व स्थानिक वास्तव्याचा दाखला किंवा रेशनकार्डची प्रत व राखीव उमेदवारांनी कार्यकारी दंडाधिकारी यांच्याकडुन प्राप्त झालेल्या जातीच्या प्रमाणपत्राची प्रत सादर करणे आवश्यक आहे.

६. **प्रवेशप्रक्रिया** ः

| | |
|---|---|
| प्रवेश अर्ज मिळण्याचे ठिकाण | ः सौ.मिनाताई ठाकरे परिचर्या प्रशिक्षण संस्था ,बी विंग राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालय हॉस्टेल बिल्डींग,. हंसनगर ,खोपट, ठाणे (प). |

| | |
|---|---|
| प्रवेश अर्ज वितरण | ः १८.०७.२०१६ पासून ०४.०८.२०१६ पर्यंत |
| प्रवेश अर्ज स्विकृतीचा दिनांक | ः १८.०७.२०१६ पासून ०६.०८.२०१६ १ |
| प्रवेश अर्ज मिळण्याची व स्विकृतीची वेळ | ः सकाळी १०.३० ते संध्याकाळी ४.०० वाजेपर्यंत (शासकिय सुटटीचे दिवस सोडून) |
| प्रारूप गुणवत्ता यादी प्रसारण | ः दि. १८.०८.२०१६ संध्याकाळी २.०० वाजता संस्थेच्या आवारात प्रसिद्ध केली जाईल. |
| प्रारूप गुणवत्ता यादी विषयी लेखी आक्षेप स्विकृती दिनांक | दि. २०.०८.२०१६ दुपारी २.०० वाज्पयॅत |
| अंतीम गुणवत्ता यादी प्रसारण | दि. २०.०८.२०१६ संध्याकाळी ४.०० वाजता |
| प्रत्यक्ष मुलाखतीचा दिनांक | दि. ०२.०९.२०१६ सकाळी ८.०० वाजल्यापासुन मुलाखतीच्या वेळी अर्जासोबत जोडलेल्या सर्व प्रमाणपत्रांच्या मुळ प्रती (ओरिजनल्स) सादर करणे आवश्यक आहे.मुलाखतीस हजर राहण्यासाठी प्रवासखर्च दिला जाणार नाही. तसेच मुलाखती संदर्भात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही व दुरध्वनीव्दारे माहिती दिली जाणार नाही. |
| निवड यादी व प्रतिक्षा यादी प्रसारण | ः १६.०९. २०१६ दुपारी २.०० वाजता संस्थेच्या आवारात प्रसिद्ध केली जाईल. |

निवड झालेल्या उमेदवारांनी दि. २०.९.२०१६ संध्याकाळी ४.०० वाजेपर्यंत प्रवेश निश्चित करणे आवश्यक आहे. प्रतिक्षायादी नुसार पुढील प्रवेश देण्यास दिनांक २२.९.२०१६ रोजी सकाळी १०.३० वाजता सुरू केले जाईल.

**सही/-**
**मा. अधिष्ठाता**
**राजीव गांधी वैधकिय महाविधालय**
**तथा छत्रपती शिवाजी महाराज रूग्णालय.**
**ठाणे महानगरपालिका ,ठाणे .**

pls. visit our official website
www.thanecity.gov.in